# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/10/2023 (रविवार) सायंकाळ

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापरखेडा – दिनांक २१/१०/२०२३ चे ०८.०० वा. ते १२.०० वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी हीची बहीणलेक वय १७ वर्ष ६ महीने हीचे गावातील आरोपी पृथ्वीराज उर्फ छोटु कोमल चव्हाण वय २१ वर्ष रा. लोणखैरी यांचेसोबत बोलचाल होती फिर्यादी ही दुपारी १२/०० वा दरम्यान कामावरून घरी परत आली तर तीची बहीणलेक घरी हजर मिळुन आली नाही. तिचा इकडेतिकडे शोध घेतला असता दिसुन आली नाही. फिर्यादी यांचा आरोपी याच्यावर संशय असल्याने त्याच्या मोबाईल क्रमांकावर फोन लावले तर फोन फिर्यादीच्या बहीणलेकीने उचलला व आवाज ऐकुन कट केला फिर्यादी हीच्या बहीणलेकीला आरोपी याने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि पिसे पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**